# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १८७-२३** **दिनांक १०/०६/२०२३**

## घरफोडी करणाऱ्या महिला अरोपीतास १२ तासांत अटक करुन एकुण ०१,२२,६५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यास नायगाव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०६/०६/२०२३ रोजी सकाळी ११:०० वा. ते दिनांक ०८/०६/२०२३ रोजी सकाळी १२:३० वा. चे दरम्यान फिर्यादी नामे श्री. महिहसुद्दीन सुल्तान अंसारी, रा सिध्दीविवनायक चाळ, टिवरी, नायगाव पर्व हे त्यांच्या सहकुटुंबासह लोणावळा येथे फिरण्यासाठी गेला असता त्याचे राहते घरातुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने घराचा दरवाजाची कडी कोयंडा वाकवुन आतमध्ये प्रवेश करुन एकुण १,२२,६५०/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने फिर्यादीच्या संमतीशिवाय घरफोडी चोरी करुन नेल्याबाबत वर नमुद फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपी विरुध्द नायगाव पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्र. I १३८/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४५४,४५७,३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने गुप्त बातमीदार व तांत्रीक विश्लेषणाचे आधारे प्राप्त माहितीच्या आधारे महिला आरोपीत नामे निशा गुलाबचंद माळी, रा. टिवरी गाव, नायगाव पुर्व हीस महिला अंमलदारकरवी ताब्यात घेवुन कौशल्यपुर्ण तपास केला असता तिने सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने तिस नमुद गुन्हयात अटक करण्यात आली. अटक महिला आरोपीताकडे अधिक तपास करता सदर गुन्हयात घरुफोडी चोरी कलेला १८.४० ग्रॅम वजनाचे सोन्याचे काळी मनी असलेले मंगळसुत्र, ३.६३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे पेंडल, २.५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी असा एकुण ०१,२२,६५०/- रुपये किंमतीचा १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्रीमती पौणिमा चौगुल-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २ वसई, श्रीमती. पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पो.नि. श्री. मिलींद साबळे (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण पथकाचे स.पो.नि. संतोष सांगवीकर, रोशन देवरे, पो.उप.नि. जिंकलवाड, पो.हवा. देविदास पाटील, पो.अंम. सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, चेतन ठाकरे, अशोक पाटील यांनी केली आहे.

---ooo---